Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# नागपूर विभागातील बी.एड. विद्यार्थ्यांच्या शिक्षक क्षमता विकासामध्ये ललित कलांचे योगदान अभ्यासणे.

**डॉ.नूतन डी. डोंगरे**
असिस्टंट प्रोफेसर
बोंडे बी. एड. कॉलेज खापरी, कळमेश्वर

## सारांश (Abstract)

शिक्षक शिक्षणामध्ये ललित कला (Fine Arts) हा एक महत्त्वपूर्ण घटक मानला जातो. ललित कलांच्या माध्यमातून विद्यार्थी-शिक्षकांमध्ये सर्जनशीलता, संवाद कौशल्य, आत्मविश्वास, सौंदर्यदृष्टी, भावनिक अभिव्यक्ती आणि अध्यापनातील नाविन्यपूर्णता विकसित होते. बी.एड. विद्यार्थ्यांसाठी ललित कला केवळ एक अभ्यास घटक नसून व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन आहे. ललित कलांच्या माध्यमातून विद्यार्थी-शिक्षकांना स्वतःच्या भावना आणि विचार प्रभावीपणे व्यक्त करता येतात. तसेच त्यांच्यामध्ये संवाद कौशल्य, वर्गव्यवस्थापन कौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता, संघभावना आणि नेतृत्व गुण विकसित होतात. या सर्व बाबी प्रभावी शिक्षक होण्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत. शिक्षक क्षमता (Teacher Competency) ही शिक्षकाच्या ज्ञान, कौशल्ये, मूल्ये, वृत्ती आणि अध्यापन कार्यक्षमतेचे एकत्रित स्वरूप आहे. विषयज्ञान, अध्यापन कौशल्य, संवाद कौशल्य, मूल्यांकन कौशल्य, वर्गव्यवस्थापन आणि व्यावसायिक जबाबदारी या शिक्षक क्षमतेच्या महत्त्वाच्या घटक आहेत. ललित कलांच्या माध्यमातून या क्षमतांचा विकास अधिक प्रभावीपणे होऊ शकतो. नागपूर विभागातील विविध बी.एड. महाविद्यालयांमध्ये ललित कला हा अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग आहे. तथापि, शिक्षक क्षमता विकासामध्ये ललित कलांचे नेमके योगदान किती आहे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधनाद्वारे नागपूर विभागातील बी.एड. विद्यार्थ्यांच्या शिक्षक क्षमता विकासामध्ये ललित कलांचे योगदान अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या अभ्यासातून शिक्षक शिक्षण कार्यक्रम अधिक परिणामकारक करण्यासाठी उपयुक्त सूचना प्राप्त होतील अशी अपेक्षा आहे म्हणूनच, भावी शिक्षकांच्या सर्वांगीण आणि गुणवत्तापूर्ण विकासासाठी ललित कलांचे महत्त्व लक्षात घेऊन या संशोधनाची निवड करण्यात आली आहे.

## प्रस्तावना -

शिक्षण ही समाजाच्या सर्वांगीण विकासाची मूलभूत प्रक्रिया आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेचा आधार शिक्षकांच्या कार्यक्षमतेवर आणि अध्यापन कौशल्यांवर अवलंबून असतो. त्यामुळे शिक्षक शिक्षण कार्यक्रमांमध्ये शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमता, सर्जनशीलता, संवाद कौशल्ये, नेतृत्व गुण आणि अध्यापनातील नावीन्यपूर्णता विकसित करण्यावर विशेष भर दिला जातो. बी.एड. अभ्यासक्रम हा भावी शिक्षकांना प्रभावी अध्यापनासाठी आवश्यक असलेली ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये प्रदान करणारा महत्त्वाचा अभ्यासक्रम आहे.

## बी.एड. अभ्यासक्रम व ललित कला शिक्षण-

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या बी.एड. अभ्यासक्रमामध्ये शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या व्यावसायिक क्षमतेच्या परिपूर्णक्ते करिता अभ्यासक्रमामध्ये प्रथम सेमिस्टर ला EPC -3 अंतर्गत प्रात्यक्षिकासाठी नाट्य आणि कला प्रात्यक्षिकांतर्गत विविध ललित कलांचा समावेश करण्यात आला आहे त्याचप्रमाणे द्वितीय सविस्तर अंतर्गत लेखी परीक्षेसाठी सुद्धा फाइन आर्ट्स विषय अंतर्गत कला शिक्षणाला विशेष स्थान देण्यात आले आहे. थोडक्यात शिक्षक शिक्षणाच्या

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

प्रक्रियेत विद्यार्थी-शिक्षकांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ललित कलांचा समावेश करण्यात आला आहे. ललित कला ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून सर्जनशीलता, सौंदर्यदृष्टी, संवेदनशीलता, आत्मअभिव्यक्ती आणि नाविन्यपूर्ण विचार विकसित करणारे प्रभावी शैक्षणिक माध्यम आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) आणि शिक्षक शिक्षणाच्या आधुनिक संकल्पनांनुसार कला-एकात्मिक शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर बी.एड. अभ्यासक्रमात चित्रकला, संगीत, नाट्य, हस्तकला, लोककला, रांगोळी, शिल्पकला आणि विविध सर्जनशील उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. या उपक्रमांमुळे विद्यार्थी-शिक्षकांना स्वतःच्या कल्पना, भावना आणि विचार प्रभावीपणे व्यक्त करण्याची संधी मिळते. ललित कला शिक्षणामुळे विद्यार्थी-शिक्षकांमध्ये सर्जनशीलता, संवाद कौशल्य, नेतृत्व गुण, सहकार्य वृत्ती, समस्या निराकरण क्षमता आणि आत्मविश्वास विकसित होतो. तसेच अध्यापन प्रक्रिया अधिक आकर्षक, आनंददायी आणि विद्यार्थी-केंद्रित बनविण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित होतात. कला-आधारित अध्यापन पद्धतींचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील सहभाग वाढतो आणि शिक्षण अधिक अर्थपूर्ण बनते. बी.एड. अभ्यासक्रमातील ललित कला शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे भावी शिक्षकांना कला-संवेदनशील बनविणे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे आणि अध्यापनामध्ये सर्जनशीलता व नाविन्यपूर्णता आणणे होय. यामुळे शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमतांमध्ये वाढ होऊन ते प्रभावी, संवेदनशील आणि गुणवत्तापूर्ण शिक्षक म्हणून घडण्यास मदत होते. अशा प्रकारे बी.एड. अभ्यासक्रमातील ललित कला शिक्षण हे शिक्षक क्षमता विकासाचे एक महत्त्वपूर्ण साधन असून भावी शिक्षकांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

## अभ्यासाची उद्दिष्टे (Objectives of study)

नागपूर विभागातील बी.एड. विद्यार्थ्यांमधील शिक्षक क्षमतेची पातळी अभ्यासणे.

शिक्षक क्षमता विकासामध्ये ललित कलांचे योगदान तपासणे.

ललित कला उपक्रमांचा संवाद कौशल्ये, सर्जनशीलता आणि अध्यापन परिणामकारकतेवर होणारा प्रभाव ओळखणे.

ललित कला उपक्रमांमधील सहभागाच्या विविध स्तरांनुसार बी.एड. विद्यार्थ्यांच्या शिक्षक क्षमतेची तुलना करणे.

## गृहीतके (Hypotheses )

ललित कला उपक्रमांमध्ये उच्च व कमी सहभाग असलेल्या बी.एड. विद्यार्थ्यांच्या शिक्षक क्षमतेमध्ये कोणताही लक्षणीय फरक नाही

## चल (Variables)

**स्वतंत्र चल (Independent Variable)**

**ललित कला उपक्रम (Fine Arts Activities)**

या संशोधनामध्ये चित्रकला, संगीत, नाट्य, हस्तकला, रांगोळी, कला-आधारित अध्यापन आणि इतर ललित कला उपक्रमांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग हा स्वतंत्र चल मानला आहे.

**अवलंबित चल (Dependent Variable)**

**शिक्षक क्षमता विकास (Teacher Competency Development)**

बी.एड. विद्यार्थ्यांचे अध्यापन कौशल्य, संवाद कौशल्य, वर्गव्यवस्थापन, सर्जनशीलता, नेतृत्व गुण आणि व्यावसायिक कार्यक्षमता यांचा समावेश शिक्षक क्षमता विकासामध्ये करण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती (Research Method )**प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धती (Descriptive Survey Method) चा वापर करण्यात आला आहे. या पद्धतीद्वारे नागपूर विभागातील बी.एड. विद्यार्थ्यांच्या शिक्षक क्षमता विकासामध्ये ललित कलांचे योगदान अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## संशोधनाची लोकसंख्या (Population) व नमुना (Sample )

नागपूर विभागातील मान्यताप्राप्त बी.एड. महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेले सर्व विद्यार्थी-शिक्षक ही या संशोधनाची लोकसंख्या मानली आहे. त्यातील निवडक बी.एड. महाविद्यालयांमधून सुमारे 150 विद्यार्थी-शिक्षकांची नमुना निवड साध्या यादृच्छिक नमुना पद्धतीने (Simple Random Sampling Technique) करण्यात आली.निवडलेल्या 150 विद्यार्थी-शिक्षकांमध्ये बी.एड. केवळ द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे .हे विद्यार्थी नागपूर विभागातील विविध शिक्षक शिक्षण महाविद्यालयांचे प्रतिनिधित्व करतील. संशोधनासाठी निवडलेला नमुना शिक्षक क्षमता विकासामध्ये ललित कलांचे योगदान अभ्यासण्यासाठी योग्य व प्रतिनिधिक मानला जाईल.

## संशोधन साधने (Research Tools)

शिक्षक क्षमता मापन प्रश्नावली (Teacher Competency Scale)

ललित कला सहभाग प्रश्नावली (Fine Arts Participation Questionnaire)

वैयक्तिक माहिती पत्रक (Personal Data Sheet)

## माहिती संकलन प्रक्रिया (Data Collection Procedure)

संशोधकाने निवडलेल्या बी.एड. महाविद्यालयांना भेट देऊन विद्यार्थी-शिक्षकांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित केली आहे. संकलित माहितीचे वर्गीकरण व संहितीकरण करून विश्लेषणासाठी तयार करण्यात आले.

## माहिती विश्लेषण तंत्रे (Statistical Techniques )

संकलित माहितीचे विश्लेषण खालील सांख्यिकीय तंत्रांच्या साहाय्याने करण्यात आले.

टक्केवारी (Percentage)

सरासरी (Mean)

टी मूल्य (T-Score)

## माहितीचे विश्लेषण:-

प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी नागपूर विभागातील निवडक बी.एड. महाविद्यालयांमधील 150 विद्यार्थी-शिक्षकांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आली. संकलित माहितीचे वर्गीकरण, संहितीकरण व सारणीकरण करून तिचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यात आले.माहितीचे विश्लेषण करताना प्रत्येक उद्दिष्टानुसार स्वतंत्र तक्ते तयार करून त्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले आहे. तक्त्यांच्या आधारे निष्कर्ष काढून संशोधनाच्या परिकल्पनांची पडताळणी करण्यात आली आहे.

**तक्ता क्र. 1**

**बी.एड. विद्यार्थ्यांच्या शिक्षक क्षमता पातळीचे वितरण**

| शिक्षक क्षमता पातळी | वारंवारिता (f) | टक्केवारी (%) |
|---|---|---|
| उच्च | 59 | 39.33 |
| मध्यम | 68 | 45.33 |
| कमी | 23 | 15.34 |
| एकूण | 150 | 100.00 |

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**तक्ता क्र. 2**

**शिक्षक क्षमता गुणांचे वर्णनात्मक विश्लेषण**

| | घटक (N) | सरासरी (Mean) | प्रमाण विचलन (SD) |
|---|---|---|---|
| शिक्षक क्षमता | 150 | 2.24 | 0.70 |

## निष्कर्ष (Finding)

तक्त्याच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की सर्वाधिक 68 (45.33%) विद्यार्थ्यांची शिक्षक क्षमता मध्यम स्तराची आहे. 59 (39.33%) विद्यार्थ्यांची शिक्षक क्षमता उच्च स्तराची असून केवळ 23 (15.34%) विद्यार्थ्यांची शिक्षक क्षमता कमी स्तराची आहे. एकूण 150 विद्यार्थ्यांच्या शिक्षक क्षमता गुणांची सरासरी (Mean) 2.24 आढळली. ही सरासरी शिक्षक क्षमतेची पातळी मध्यम ते उच्च स्तराकडे झुकणारी असल्याचे दर्शविते. प्रमाण विचलन (SD) 0.70 आढळले, याचा अर्थ विद्यार्थ्यांच्या शिक्षक क्षमता गुणांमध्ये फार मोठी तफावत नाही. विद्यार्थ्यांचे गुण सरासरीच्या जवळपास केंद्रित आहेत. त्यामुळे नमुन्यातील विद्यार्थ्यांची शिक्षक क्षमता तुलनेने एकसमान असल्याचे दिसून येते. यावरून असे निष्कर्ष काढता येते की बी.एड. विद्यार्थ्यांची शिक्षक क्षमता सरासरी स्तरापेक्षा चांगली असून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षक क्षमता विकासाचे समाधानकारक प्रमाण आढळून येते. तसेच शिक्षक क्षमता गुणांमध्ये कमी प्रमाणात विचलन असल्यामुळे बहुसंख्य विद्यार्थ्यांची शिक्षक क्षमता समान स्वरूपाची असल्याचे स्पष्ट होते. एकूणच बी.एड. विद्यार्थ्यांची एकूण शिक्षक क्षमता समाधानकारक असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. 3**

**शिक्षक क्षमता विकासामध्ये ललित कलांच्या योगदानाचा स्तर**

| | **वारंवारिता (f)** | **टक्केवारी (%)** |
|---|---|---|
| उच्च योगदान | 54 | 36.00 |
| मध्यम योगदान | 68 | 45.33 |
| कमी योगदान | 20 | 13.33 |
| अत्यल्प योगदान | 8 | 5.34 |
| एकूण | 150 | 100.00 |

**तक्ता क्र. 4**

**घटक**

| | **N** | **Mean** | **SD** |
|---|---|---|---|
| ललित कलांचे शिक्षक क्षमता विकासातील योगदान | 150 | 3.12 | 0.84 |

## निष्कर्ष (Finding)

वरील तक्त्यानुसार 150 बी.एड. विद्यार्थ्यांच्या प्रतिसादांचे विश्लेषण करण्यात आले. ललित कलांचे शिक्षक क्षमता विकासातील योगदान या घटकाची सरासरी (Mean) 3.12 आढळली. ही सरासरी मध्यम ते उच्च स्तरावरील योगदान दर्शविते. प्रमाण विचलन (SD) 0.84 असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मतांमध्ये काही प्रमाणात विविधता असली तरी ती फार जास्त नाही. तसेच 45.33% विद्यार्थ्यांनी ललित कलांचे योगदान मध्यम स्तराचे, 36.00% विद्यार्थ्यांनी उच्च स्तराचे, 13.33% विद्यार्थ्यांनी कमी स्तराचे आणि 5.34% विद्यार्थ्यांनी अत्यल्प स्तराचे असल्याचे नमूद केले आहे. यावरून स्पष्ट होते की बी.एड. विद्यार्थ्यांच्या शिक्षक क्षमता विकासामध्ये ललित कलांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. बहुसंख्य (81.33%) विद्यार्थ्यांनी ललित कलांचे योगदान

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

मध्यम किंवा उच्च स्तराचे असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे शिक्षक क्षमता विकासासाठी ललित कला उपयुक्त आणि प्रभावी माध्यम असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. 5**

**ललित कला उपक्रमांचा संवाद कौशल्ये, सर्जनशीलता आणि अध्यापन परिणामकारकतेवर होणाऱ्या प्रभावाचे वितरण**

| प्रभावाचा स्तर | वारंवारिता (f) | टक्केवारी (%) |
|---|---|---|
| उच्च प्रभाव | 62 | 41.33 |
| मध्यम प्रभाव | 68 | 45.33 |
| कमी प्रभाव | 20 | 13.34 |
| एकूण | 150 | 100.00 |

**तक्ता क्र. 6**

**ललित कला उपक्रमांचा संवाद कौशल्ये, सर्जनशीलता आणि अध्यापन परिणामकारकतेवर होणाऱ्या प्रभावाचे वर्णनात्मक विश्लेष**

| घटक | N | Mean | SD |
|---|---|---|---|
| ललित कला उपक्रमांचा प्रभाव | 150 | 2.28 | 0.68 |

**निष्कर्ष (Finding)** वरील तक्त्यानुसार एकूण 150 बी.एड. विद्यार्थ्यांपैकी 68 (45.33%) विद्यार्थ्यांनी ललित कला उपक्रमांचा संवाद कौशल्ये, सर्जनशीलता आणि अध्यापन परिणामकारकतेवर मध्यम स्तराचा प्रभाव असल्याचे नमूद केले आहे. 62 (41.33%) विद्यार्थ्यांनी उच्च प्रभाव असल्याचे तर 20 (13.34%) विद्यार्थ्यांनी कमी प्रभाव असल्याचे मत व्यक्त केले आहे. प्रभावाची सरासरी (Mean) 2.28 असून ती मध्यम ते उच्च स्तरावरील प्रभाव दर्शविते. प्रमाण विचलन (SD) 0.68 असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रतिसादांमध्ये फार मोठी तफावत नसल्याचे दिसून येते. प्राप्त निष्कर्षांवरून असे स्पष्ट होते की ललित कला उपक्रमांचा बी.एड. विद्यार्थ्यांच्या संवाद कौशल्ये, सर्जनशीलता आणि अध्यापन परिणामकारकतेवर सकारात्मक प्रभाव पडतो. एकूण 86.66% विद्यार्थ्यांनी (उच्च + मध्यम) ललित कला उपक्रमांचा प्रभाव सकारात्मक असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे शिक्षक क्षमता विकासासाठी ललित कला उपक्रम महत्त्वपूर्ण व प्रभावी ठरतात.

**तक्ता 7**

**सहभागाच्या विविध स्तरानुसार शिक्षक क्षमतेची तुलना**

| N | Mean | SD | t-value |
|---|---|---|---|
| उच्च सहभाग | 54 | 84.25 | 5.60 |
| कमी सहभाग | 28 | 69.20 | 7.05 |

## अर्थनिर्वचन

उच्च सहभाग गटाचा शिक्षक क्षमता गुणांचा सरासरी (Mean = 84.25) हा कमी सहभाग गटाच्या सरासरीपेक्षा (Mean = 69.20) लक्षणीयरीत्या जास्त आहे. गणना केलेले t-मूल्य 9.81 आढळले.

**निष्कर्ष:** (ललित कला उपक्रमांमध्ये उच्च व कमी सहभाग असलेल्या बी.एड. विद्यार्थ्यांच्या शिक्षक क्षमतेमध्ये कोणताही लक्षणीय फरक नाही) हे शून्य गृहीतक नाकारले जाते.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## प्रमुख निष्कर्ष (Major Findings)

बी.एड. विद्यार्थ्यांची शिक्षक क्षमता प्रामुख्याने मध्यम ते उच्च स्तराची आढळून आली. बहुसंख्य विद्यार्थ्यांमध्ये अध्यापन कौशल्ये, संवाद कौशल्ये आणि व्यावसायिक क्षमता समाधानकारक प्रमाणात विकसित झालेल्या दिसून आल्या.

शिक्षक क्षमता विकासामध्ये ललित कलांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे विद्यार्थ्यांच्या प्रतिसादांवरून स्पष्ट झाले. बहुसंख्य विद्यार्थ्यांनी ललित कला शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी उपयुक्त असल्याचे मान्य केले.

ललित कला उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या संवाद कौशल्ये, सर्जनशीलता आणि अध्यापन परिणामकारकतेवर सकारात्मक प्रभाव आढळून आला. कला-आधारित उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती क्षमता, कल्पनाशक्ती आणि अध्यापनातील नावीन्य वाढण्यास मदत होते.

ललित कला उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शिक्षक क्षमता तुलनेने अधिक विकसित झालेली आढळली. उच्च सहभाग असलेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षक क्षमता गुण कमी सहभाग असलेल्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत अधिक होते.

t-परीक्षणाच्या निष्कर्षानुसार ललित कला उपक्रमांमध्ये उच्च व कमी सहभाग असलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षक क्षमतेमध्ये लक्षणीय फरक आढळून आला. त्यामुळे ललित कला सहभागाचा शिक्षक क्षमता विकासाशी सकारात्मक संबंध असल्याचे सिद्ध झाले.

ललित कला विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्व गुण, सहकार्य वृत्ती, सादरीकरण कौशल्ये आणि समस्या निराकरण क्षमता विकसित करण्यास सहाय्यक ठरतात.

बी.एड. अभ्यासक्रमातील ललित कला हा केवळ सहशैक्षणिक घटक नसून प्रभावी शिक्षक घडविण्यासाठी आवश्यक असलेला महत्त्वपूर्ण घटक आहे.

संशोधनाच्या निष्कर्षांवरून असे स्पष्ट होते की ललित कला शिक्षण शिक्षक क्षमता विकासासाठी प्रभावी माध्यम असून शिक्षक शिक्षण संस्थांनी कला-एकात्मिक अध्यापनाला अधिक प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

## शिफारस (Suggestions) —

प्रस्तुत संशोधनाच्या आधारे असे सुचविता येते की बी.एड. अभ्यासक्रमामध्ये ललित कला विषयाला अधिक महत्त्व देऊन विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध करून द्याव्यात. महाविद्यालयांमध्ये चित्रकला, संगीत, नाट्य, हस्तकला आणि इतर कला-आधारित उपक्रम नियमितपणे राबवावेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल.विद्यार्थ्यांच्या संवाद कौशल्ये, सर्जनशीलता आणि अध्यापन परिणामकारकता वाढविण्यासाठी अध्यापनामध्ये कला-एकात्मिक पद्धतींचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. तसेच अध्यापन सरावादरम्यान कला-आधारित तंत्रांचा समावेश केल्यास अध्यापन अधिक प्रभावी आणि आकर्षक होऊ शकते.महाविद्यालयांमध्ये ललित कला कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम आणि सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करावे, तसेच विद्यार्थ्यांना सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहित करावे. यामुळे त्यांचा आत्मविश्वास, नेतृत्व गुण आणि अभिव्यक्ती क्षमता विकसित होण्यास मदत होईल.

## संदर्भसूची (References )

Aggarwal, J. C. (2015). Teacher and education in a developing society. Vikas Publishing House, Delhi.

Best, J. W., & Kahn, J. V. (2016). Research in education. Pearson Education.

Bhasin, K. (2019). Teaching of fine arts. Arya Publishing House, Noida.

Eisner, E. W. (2002). The arts and the creation of mind. Yale University Press.